# प्रकरण चौथे
# ‘ना. घ. देशपांडे यांच्या कवितेची वैशिष्ट्ये’


०१ प्रास्ताविक

०२ भावकविता

२.१ प्रेमकविता

२.२ कवितेतील निसर्ग

०३. प्रायोगिक रचना

०४. प्रादेशिकता

०५. गेयता

०६. प्रसंगवर्णनातील चित्रमयता

०७. शैली

०८. समारोप

संदर्भ ग्रंथ

# प्रकरण चौथे
# ना. घ. देशपांडे यांच्या कवितेची वैशिष्टये

## ०१. प्रास्ताविक :

प्रस्तुत प्रकरणात कवी ना. घ. देशपांडे यांच्या 'शीळ' व 'कंचनीचा महाल' या दोन काव्यसंग्रहातील कवितांचे वाङ्मयीन विशेषांचा अभ्यास करावयाचा आहे. भावकविता, प्रेमकविता, निसर्गकविता, प्रायोगिक रचना, प्रादेशिकता, गेयता, प्रसंगवर्णनातील चित्रमयता, शैली हे विशेष येथे सविस्तरपणे पहावयाचे आहेत. काव्यसंग्रहाच्या वातावरण निर्मितीबरोबर काव्यातून प्रकटलेली प्रेमानुभूती व निसर्गानुभव यांचा देखील येथे विचार करावयाचा आहे.

## ०२. भावकविता :

'भावकाव्य' ही संज्ञा इंग्रजीत 'लिरीक' (Lyric) या शब्दाला पर्याय म्हणून आली आहे. मराठी साहित्यात 'लिरीक' या शब्दाला वैणिक, वीणाकाव्य आदी अनेक प्रतिशब्द पहावयास मिळतात. "ज्यामध्ये गायनाचा भाग नसला तरी अंतस्थ भावलयीने जी गीतात्मकता काव्यात प्रकटते त्या काव्याला 'भावकविता' म्हणतात."[१] भावकविता शब्द आणि अर्थ यांत जवळचे नाते असते. कवीचे स्वतः अनुभवलेले अनुभव, प्रसंग प्रामुख्याने येत असल्याचे दिसतात. वैयक्तिक भावनेची अभिव्यक्ती भावकवितेत घडते म्हणून भावकवितेत अंतस्थ भावाला महत्त्व आलेले दिसते.

कवीच्या अंतर्मनातील भावभावनांवर, विचारांवर प्रामुख्याने भावकविता अवलंबून असल्याचे दिसते. कवी ना. घ. देशपांडे यांच्या काव्यसंग्रहातील प्रत्येक कवितेत कोणता ना कोणतातरी भाव प्रदर्शित होतो. म्हणून त्यांचे काव्य म्हणजे भावाचे रेखांकित केलेले रूपचित्र म्हणावे लागेल. 'शीळ' काव्यसंग्रहातील बहुतांशी कविता भावकविता असून ती आकाराने लहान असली तरी आशयाने अधिकाधिक संपन्न आहेत. त्यामुळेच कवी आपल्या कवितेत भावनेची तरलता, संवेदनशीलता अचूकपणे टिपताना दिसतो.

'एकटा मी आणि होती एकली तू
या गळ्याची आण, होती घेतली तू
फार वर्षांनी तुझ्या, भेटीस आलो
का कपाळाला अढी ही घातली तू ?'

('शीळ' काव्यसंग्रह, एकवेळी पृ.क्र. ६१)

'शीळ' या काव्यसंग्रहातील वरील कवितेत कवी ना. घ. देशपांडे प्रियकर व प्रेयसी यांच्या मनातील भाव व्यक्त करताना दिसतात. प्रेयसी जेव्हा प्रियकराला सोबत करण्यास नकार देते, तेव्हा आपले प्रेम विफल ठरले याची जाणीव त्या प्रियकराला होते. प्रस्तुत कवितेत कवी कमी शब्दात जास्त आशय प्रकट करतात. सफल प्रेमाचे विफल प्रीतीत रूपांतर कसे झाले हे एकूण चार ओळीतच कवीने स्पष्ट करून दाखविले आहे. भावजागृती, भावनांचे विकसन, भावनांची स्थिरता हे भावकवितेत येत असलेले तिन टप्पे येथे तंतोतत लागू पडताना दिसतात.

'या गळ्याची आण होती घेतली तूं' (एकवेळी, पृ.क्र. ६१)

या ओळीत भावजागृत झालेला दिसतो. वरील ओळ सफल प्रेमाची द्योतक ठरते. लगेच दुसऱ्या कडव्यात प्रियकराच्या नशिबात विफल प्रेम आल्याचे दिसते.

'संपला सारा जरी जिव्हाळा
यापुढे साधेसुधे सौजन्य दे तूं' (एकवेळी पृ.क्र. ६१)

प्रेमविफल ठरले तरी प्रियकराच्या भावनांचे येथे विकसन झाल्याने आता त्याला तिचे साधे सौजन्य देखील पुरेसे वाटायला लागते. त्यातच तो समाधानी होतो. तर तिसऱ्या कडव्यात त्याच्यातील स्थिरता दर्शविलेली आहे.

'एकवेळी वाटली होती जीवाला
चांदणी विस्तीर्ण अंधारातली तू' (एकवेळी पृ. क्र. ६१)

त्याच्या मनातील भावभावना येथे स्थिर झाल्यासारख्या वाटतात.

भावकवितेत आरंभापासून शेवटपर्यंत भावनांची उत्कटता असते. 'कंचनीचा महाल'

या काव्यसंग्रहात आलेल्या चारही कविता भावनेचा उत्कटबिंदू गाठताना दिसतात. कवितेत सुरूवात ते शेवट होईपर्यंत वेगवेगळे भाव प्रदर्शित होताना दिसतात. भावकवितेत केवळ भावनाच येतात असे देखील नसते. भावनेबरोबरच विचार, कथन, नाट्य जोडीला आलेले असते. ना. घ. देशपांडे यांच्या 'शीळ' या काव्यसंग्रहातील 'हे जीवन' (पृ.क्र. ६४) या कवितेत कवी आपले वैयक्तिक व आत्मनिष्ठ अनुभव व्यक्त करतात. आपला जगण्याविषयीचा, जगाविषयीचा विचार ते मांडतात. त्याचबरोबर 'रामप्रहारी' (पृ.क्र. ४३) या कवितेत प्रियकर-प्रेयसी व चंद्र यांच्या हालचालीचे वर्णन नाट्यात्मक स्वरूपात मांडतात.

'तू हळूच येतो, चंद्रा माझ्या मागं ऽ !
भयभयीत अशी मी : कुणीच नाही जाग ऽ
हे पाठीमागं ऽ तुझचं ऽ हसरं बिंब
अन् समोर माझी पिशी साऊली लांब'

(रामपहारी पृ.क्र. ४३)

त्याचबरोबर 'त्याला नाही कदर' (पृ.क्र. ६१), 'शीळ' (पृ.क्र. २५), 'किशोरी' (पृ.क्र. ४१), 'मनोगत' (पृ.क्र. ४७), 'अजून' (पृ.क्र. ५२) इत्यादी अनेक कवितेतील वर्णन कथनात्मक, नाट्यमय स्वरूपाचे असल्याचे दिसते 'शीळ' काव्यसंग्रहात येणाऱ्या बऱ्याचशा कविता त्यांच्या स्वत:च्या जीवनातील अनुभवातून साकार झालेल्या आहेत. 'फुले आणि काटे' या आत्मकथनात्मक पुस्तकात त्याबाबत लेख लिहून त्यांनी खुलासा केला आहे. या पुस्तकात असलेल्या लेखात आपली कविता कशी घडली, त्यामागे असलेली पार्श्वभूमी कवी सांगतात. भावकवितेच्या लक्षणाचा विचार करता भावकवितेत व्यक्त झालेले अनुभव हे स्वत: कवीचे असतात. 'शीळ' या काव्यसंग्रहात येणाऱ्या बहुतेक कवितांना कवीच्या व्यक्तिगत अनुभवांची जोड आहे. 'शीळ' काव्यसंग्रहात आलेल्या कविता सहजशुध्द भाव व्यक्त करतात. कवीने तर्कवादापेक्षा मुक्त विचाराला कवितेत प्राधान्य दिल्याचे दिसते. भावकवितेत देखील तर्कवादाला अजिबात महत्त्व दिले जात नाही. 'शीळ' या काव्यसंग्रहात आलेली 'जाणीव' (पृ.क्र. ८३) ही

कविता सहजशुध्द भाव व्यक्त करते. येथे तर्कवाद, कपटाला स्थान मिळत नाही. कवितेतील प्रियकर-प्रेयसीला आपला एकमेकांचा लाभलेला सहवास हीच प्रीत होती याची जाणीव व्हायला वेळ लागला. असा आशय सांगणारी ही कविता सहजशुध्द भाव सांगून जाते.

'तू आणीक मी बसून तेथे
बोलत होतो सहजच तेथे
सहजच सारे वाटत नव्हते
त्या दिवशी पण तुला मला ही'

('शीळ' पृ.क्र. ८३)

आपली प्रीत ही सहवासातून उमललेली आहे. हेच येथे सांगितले आहे. कवी ना. घ. देशपांडे यांच्या काव्यात त्यांच्या अंतर्मनातील उत्कटभाव आलेले आहेत. 'शीळ' काव्यसंग्रहात आलेली प्रत्येक कविता आशयदृष्टया भारदस्त अशी आहे. त्यात बाजारी रंगरंगोटीपणा नाही. सहज शुध्दभाव, यमकाचा अचूक वापर साधल्याने काव्यात नाद, लय, निर्माण होऊन कविता गेय बनलेली दिसते.

'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहातील कविता आकाराने दीर्घ असल्यातरी त्यामधून प्रामुख्याने प्रत्येक पात्राच्या वर्णनातून त्यांच्या मनातील भाव व्यक्त होताना दिसतो. एकाच कवितेत वेगवेगळे भाव प्रदर्शित होतात व कविता आकर्षक रूप धारण करते.

## २.१ प्रेमकविता :

अर्वाचीन कालखंडामध्ये येणाऱ्या बहुतेक कवींनी काव्यलेखनासाठी प्रेम हाच विषय हाताळल्याचे दिसते. कवीकुलगुरू केशवसुत, प्रेमाचे शाहिर गोविंदाग्रज, वसंत बापट त्याचबरोबर रविकिरण मंडळातील सदस्य व इतर समकालिन कवी यांनी प्रेमभावनेवर भरभरून काव्य लिहिल्याचे लक्षात येते. प्रत्येक कवीने आपआपल्या परीने आपल्या मनातील प्रीतीभावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. अशात काहींची कल्पनेने रंगविलेली प्रीतभावना फसली तर काहीची त्यांच्या प्रतिभास्पर्शाने फुलून आली. त्यांत प्रामुख्याने कवी ना. घ. देशपांडे यांची प्रेमविषयक कविता बहरून आल्याचे दिसते.

कवी ना. घ. देशपांडे यांनी प्रसिध्द केलेल्या त्यांच्या पाचही काव्यसंग्रहाचा विषय बहुतांश 'प्रेम' असल्याचे दिसते. त्यांचा पहिलावहिला 'शीळ' काव्यसंग्रहात अधिक कविता प्रेम व्यक्त करणाऱ्या आहेत.

आपली पत्नी, प्रेयसी यांच्या प्रेमात त्यांची कविता रममाण होताना दिसते. त्यांच्या काव्यात येणाऱ्या प्रेयसीला आपला प्रियकर सर्वस्व वाटतो व त्याच्या प्राप्तीसाठी ती समाजाची बंधने तोडण्यास तयार असल्याचे दिसते. तिचे याच्यावर अतोनात प्रेम असून त्याच्या कर्तृत्वाचा तिला अभिमान असल्याचे जाणवते. प्रियकर-प्रेयसी यांच्यात असलेली एकमेकांविषयीची ओढ, त्यांच्यातील उत्कट आतुरता दोघात असलेल्या खऱ्या प्रेमाची पावतीच म्हणावी लागेल. पण जेव्हा प्रेयसी त्याला नकार देते, तेव्हा हा प्रियकर उदास होऊन बसतो. त्याला विरह सहन होत नाही तेव्हा तो स्वत:च स्वत:ला समजावणीचे बोल देऊन एकांतवासाचा आधार घेतो. तर कधी प्रेयसी स्वत: अंगी धिटाई बाळगून प्रियकराला साद देते व त्याला समाजापासून दूर नेऊन आपली प्रीत फुलवताना दिसते.

कवी ना. घ. देशपांडे यांच्या काव्यात येणारे प्रेम हे विशुध्द स्वरूपाचे आहे. हे प्रेम शहरी वळणाचे नाही त्याचबरोबर पुर्णपणे ग्रामीण वस्तीतील नाही तर ते रानावनात फेरफटका मारणारे मुक्त असे आहे. कवीला प्रीतीतून मुक्ती नको तर प्रीती हिच मुक्ती असे ते मानतात. कवीचे कवित्व प्रेमकाव्यातून उभारून आलेले दिसते. त्यांच्या प्रेम काव्याला वास्तवाचे भान आहे हे त्यांच्या कवितेचे विशेष सांगता येईल.

कवी ना. घ. देशपांडे आपल्या काव्यातून प्रेमाच्या विविध छटा व्यक्त करताना अलंकार, रूपके, प्रतिमा यांचा सुरेख वापर करतात. प्रियकर-प्रेयसी यांच्या अंतर्मनात उमटत असलेली सूक्ष्म भावस्पंदने कवी कवितेत व्यक्त करतात. प्रियकराची आतुरता, प्रेयसीचा हळूवारपणा, नाजूकपणा तिची समाजाला विरोध करण्याची धिटाई कवी कवितेत मांडतो. १९३० च्या कालावधीत स्त्रीला समाजाने अनेक बंधनानी जखडले असताना कवी मात्र अशा स्त्रीला मुक्त वावरण्यास प्रोत्साहन देतो. यातून त्यांचा स्त्री विषयक सकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो.

कवी ना. घ. देशपांडे आपल्या 'शीळ' व 'कंचनीचा महाल' या दोन्ही काव्यसंग्रहात व्यक्तीच्या प्रेमभावनेवर भर देतात. प्रेम व्यक्त करताना प्रेमाच्या प्रवासात आलेली सफलता त्याचबरोबर विफलता सुध्दा खुल्या दिलाने मांडतात. त्यात ते कोणतीही संकोचितता ठेवत नाही. कवी आपल्या कवितेत ही सफलता, विफलता जशीच्या तशी आणतात.

'आज नाही, सखे
येथ कोणी दुजे;
आणि माझे-तुझे
तुझ्यामाझ्यांत ग ऽ !

(तुझ्यामाझ्यांत ग ऽ पृ. क्र. २०)

वरील कवितेतेली ओळीत प्रियकर-प्रेयसी मन, भावना यांनी एकत्र आलेले आहेत. जेथे दोघांची मने जुळतात. भावना, विचार यात कुठेतरी साम्यता साधली जाते, तेव्हा प्रीत सफल झाल्याचे म्हणता येते. वरीलप्रमाणे एकमेकांतील समरसतेतून सफल प्रीत झाल्याचे लक्षात येते. याचप्रमाणे 'तुझ्यासाठी' (पृ.क्र.२३), 'काळ्या गढीच्या जुन्या' (पृ.क्र. ७९) या कवितेतून प्रियकरासाठी प्रेयसीने जगातील रूढी, परंपरा, रीतिरिवाज सोडल्याचे स्पष्ट होते. बंदिस्तपणाचे पाश झुगारून प्रियकाराच्या बाहूत प्रवेश करून त्याला आपले सर्वस्व बहाल करताना ती दिसते. येथे प्रेम सफल झाल्याचे लक्षात येते. कवी आपल्या काव्यसंग्रहात सफल प्रेमाबरोबर विफल प्रेम देखील व्यक्त करतात.

'फुलुन हसताच मी तुला दिली नवी कळी
खुडून एक एक तूं झुगारलीस पाकळी'

(ती कळी आणि साखळी, पृ.क्र. ६८)

वरील ओळीतून प्रियकराला प्रेमात विफलता आल्याचे स्पष्ट होते. तिचे हसणे या प्रियकराला प्रीत वाटली. तेव्हा याने तिला प्रेमाचे प्रतीक म्हणून कळी दिली मात्र तिने एक एक पाकळी विलग करून त्याचे प्रेम झुगारून दिले. येथे प्रियकर आपल्या प्रेमात असफल झालेला दिसतो.

कवी ना. घ. देशपांडे यांची प्रेमकविता स्त्री-पुरूषाच्या तपशिलवार देहवर्णनात रमत नाही. साजशृंगाराचे वर्णन कवितेत येत असले तरी उन्मादक अश्लिल भावाचे रेखाटन ते करीत नाहीत. कवीची कविता स्त्री देहावर प्रेम व्यक्त करणारी नाही तर त्या देहात वसत असलेल्या मनावर प्रेम करणारी आहे. त्यांच्या काव्यात येणारे प्रेम फसवेगिरी, घातकी वृत्तीचे नाही. मुळी ते प्रेम तशात मोडणारे नाही. त्यांच्या काव्यात शृंगाररस येत असला तरी उत्तान होताना दिसत नाही.

कवी ना. घ. देशपांडे यांच्या कवितेतील प्रियकर-प्रेयसी एकमेकांच्या शारीरिक आकर्षणातून जवळ आल्याचे दिसत नसून त्याच्या मध्ये असलेल्या निखळ प्रीतीभावनेतून आल्याचे सांगता येईल. समाज जेव्हा या निखळ प्रेमाला विरोध करतो तेव्हा कवी या समाजव्यवस्थेला विरोध करतो. मात्र या समाजातील दिवसेंदिवस लोप पावत असलेली माणुसकी, जिव्हाळा, आपुलकी याबाबत तो खंत व्यक्त करतो. कवी आपल्या कवितेतून समाजाला प्रेमाचा आदर्श घालून देऊ इच्छितो. यातून त्यांची समाजाविषयीची तळमळच व्यक्त होते.

ना. घ. देशपांडे यांच्या 'शीळ' व 'कंचनीचा महाल' या दोन्ही काव्यसंग्रहातून 'सखू', 'कंचनी', 'गिरिजा' त्याचबरोबर 'जुईची कळी' या कवितेतील प्रेयसी यांच्या माध्यमातून तरुणमनाचे उल्हासित, उन्मादित भाव व्यक्त होतात. कवीच्या कवितेत आलेल्या प्रेमभावना या त्यांच्या पत्नीच्या सहवासातून आल्याने त्यांची पत्नी हीच त्यांच्या काव्याची प्रेरणा आहे असे काही समीक्षक मानतात. याबाबत प्रसिध्द कवयित्री शांता शेळके म्हणतात - ''ना. घं. च्या अनेक सुंदर प्रेमकविता पत्नीच्या सहवासातून निर्माण झाल्या आहेत.''[२]

ना. घ. देशपांडे यांची पत्नी त्यांना त्यांचे काव्य गायन करून दाखवायची, त्यांना काव्यलेखनास प्रेरणा द्यायची. सुंदर, सुशील, शांत असल्यामुळे तिच्या सहवासातून त्यांना कविता सुचल्या असाव्यात असे म्हणायला हरकत नाही. कवयित्री शांता शेळके यांचे मत येथे उचित असल्याचे दिसते.

अशाप्रकारे कवी ना. घ. देशपांडे यांची प्रेमकविता मुक्त मनाचा आविष्कार करणारी आहे. स्वच्छंदी स्वभावाची त्यांची कविता रसिक वाचकांचे मन मोहित करून त्याला वारंवार वाचनास प्रवृत्त करते. त्यांनी लिहिलेल्या कवितेने मराठी काव्यात नवा पायंडा पाडल्याचे दिसते.

## २.२ कवितेतील निसर्ग :

पुरातन काळापासून व्यक्तिमनाला निसर्गाची ओढ अधिक तीव्र असल्याचे दिसते. या निसर्गाच्या कुशीतच व्यक्ती आपले जीवनमान घडवितो म्हणून साहित्यिकांच्या लेखनात निसर्ग भरभरून आल्याचे दिसते. त्यात कविमन तर निसर्गाला बोलके करतो. त्याच्या साहाय्याने आपल्या इच्छा-आकांक्षाचे मनोरे उभारतो. त्यातून त्याला विविध संवेदना प्राप्त होतात. कालिदासाचे मेघदूत, शांकुतल, व्यासाच्या रामायणात व आजपर्यंत कथा, कादंबरी, कविता व अन्य वाङ्मयप्रकारात निसर्ग ओघाने आला असल्याचे दिसते. म्हणून निसर्ग व मानव यांना एकमेकांपासून विभक्त करणे शक्यच नाही.

अर्वाचिन कालखंडामध्ये अनेक कवींनी आपल्या कवितेचा विषय 'निसर्ग' केल्याचे दिसते. कवी कुलगुरू केशवसुत यांच्या कवितेत निसर्ग वातचक्राचे रूप घेऊन येतो. बालकवीच्या काव्यात 'अरूण', 'फुलराणी' 'संध्यारजनी' व निर्झराच्या माध्यमातून समोर येतो, तर रेव्हरंड टिळक यांच्या वनवासी फुलाच्या माध्यमातून जीवनाचे तत्त्वज्ञान उलगडण्याचे काम करतो. या पुढच्या काळात रविकिरण मंडळातील सदस्यांनी आपआपल्या प्रतिभेने निसर्ग चित्रित केल्याचे दिसते व त्यांचेच समकालिन म्हणजे विदर्भातील कवी ना. घ. देशपांडे हे निसर्गातील विविध छटांना प्रामुख्याने चित्रित करून काव्यात प्राधान्य देताना दिसतात. त्यांचे बुलढाणा जिल्ह्यातील शेंदूरजन, मेहकर, खामगाव, लोणार या निसर्गरम्य परिसरात वास्तव्यास असल्याने त्यांच्या काव्यात या प्रदेशातील निसर्ग आवर्जून येतो. याबाबत डॉ. सुषमा करोगल म्हणतात, ''आपल्या सभोवतालच्या निसर्गाशी जी एकरूपता कवीने साधली, तीच त्यांच्या कवितेत आली आहे. ना. घं. ची कविता बाह्य प्रभावाने कोणतीही गोष्ट स्वीकारत नाही. याचा प्रत्यय आल्यावाचून राहत नाही.''[३] यावरून कवीची निसर्गाशी असलेली एकरूपता लक्षात येते. कवीच्या 'शीळ'

(१९५४) या काव्यसंग्रहात येणारा निसर्ग हा सामान्यत: एकटेएकटेपणाने येत नाही तर हा प्रियकर-प्रेयसीच्या प्रेमभावनेला, आईच्या मातृभावाला, मुलाच्या आईविषयक असलेल्या ओढीला सोबत करतो. कवी कवितेत येणाऱ्या निसर्गाच्या साहाय्याने प्रियकर-प्रेयसीच्या मनातील खंत, उल्हास, उन्माद विविध निसर्ग प्रतिमातून व्यक्त करतात.

कवी ना. घ. देशपांडे यांची कविता निसर्गाशी एकरूप होऊन त्यातील सूक्ष्म बारकावे टिपते. त्यांच्या कवितेत जेथे निसर्गाचे संदर्भ येतात तेथे त्यांची कविता अधिक प्रभावी बनल्याचे दिसते. निसर्गातील अनेक क्षणदृश्ये कवी जशीच्या तशी डोळ्यासमोर उभी करतात व अचूकपणे टिपतात. त्यांची 'निद्रा' (पृ.क्र. २६), 'मालन' (पृ.क्र.२८), 'सुंदरता' (पृ.क्र. ४६), 'समाधि' (पृ.क्र. ५१) या कवितेतून उत्कृष्ट निसर्ग चित्रण पहावयास मिळते. कवी ना. घ. देशपांडे यांची कविता निसर्गाशिवाय वेगळी होऊ शकत नाही. त्याच्या बऱ्याच कवितेत निसर्ग व प्रेमभावना सरमिसळ होताना दिसते. उदा. 'शीळ' ही कविता -

'वाहे झरा ग झुळझुळ वाणी
तिथं वाऱ्याचि गोड गोड गाणी
तिथं राया तू उभा असशील'

(शीळ, पृ.क्र. २५)

वरील कवितेतून प्रतिक्षा करीत असलेला प्रियकर व निसर्गरम्य वातावरण यांचा सहसंबंध जोडला आहे. अशाप्रकारे कवीच्या काव्यात पानोपानी निसर्ग आलेला आपणास त्यांच्या अनेक कवितांत दिसेल.

कवी ना. घ. देशपांडे यांच्या कवितेत निसर्गातील झाडे, झुडपे, वेली, नानाविध फुले, नानाविध पक्षी वावताना दिसतात. उन्ह, चांदणे, सुर्य, चंद्र, पाऊस नानाविध गंध, रंग यांच्या छटा दिसतात. त्यांच्या कवितेत पहाट, दुपार, संध्याकाळ, रात्र यांचे दर्शन होते. गढी, डोंगर, मळे, आकाश येतात. चैत्र, पौष, आषाढ अशा निरनिराळ्या महिन्यातील निरनिराळ्या ऋतूंचे दर्शन होते. निसर्गातील रंग गंधाची उधळण अत्यंत सौंदर्यमयतेने त्यांच्या कवितेत अनुभवाला मिळते. अशाप्रकारे त्याच्या कवितेत निसर्गातील सर्व काही येताना दिसते.

कवी व्यक्ती जीवनातील दु:ख, आनंद, विस्मय, कारूण्य व्यक्त करण्यासाठी निसर्गप्रतिमांचा वापर करतात. निसर्गप्रतिमातून काव्याच्या सौंदर्यात अधिक भर पडल्याचे दिसते. कवीच्या कवितेत फळाफुलांनी बहरलेला निसर्ग येतो तर प्रसंगानुसार सुकलेली सुमने, काळोखी रात्र, ढवळी रात, गलितपर्ण याच्या साहाय्याने त्याच्या मनातील उदासिनता व्यक्त होते. कवी काही कवितेत निसर्गाचे तपशिलवार वर्णन करताना दिसतात. 'हसेल रे जग' (पृ.क्र. ८६), पावसाळा (पृ.क्र. ६२) त्याचबरोबर 'चल लगबग' (पृ.क्र. ८६) इत्यादी निसर्गप्रेमातून येणाऱ्या कविता भावजीवनाला स्पर्श करतात. निसर्ग संवेदनेतून नाजूक कोवळ्या प्रेम भावनेच्या तरल सूक्ष्म छटा शब्दाद्वारे छेडण्याचे सामर्थ्य त्यांच्याजवळ असल्याचे लक्षात येते. कवीच्या 'शीळ' काव्यसंग्रहात येत असलेली निसर्गाची ओढ 'कंचनीचा महाल' या दीर्घकाव्यसंग्रहात अधिक तीव्रतेने आल्याचे दिसते. कवीच्या कवितेत येणारा निसर्ग वर्तमान, भूत, भविष्य या तिन्ही काळाशी समरस होऊन मनातील भाव भावना व्यक्त करतो. त्यांची कविता प्रक्षोभ, राजकीय, द्वेषभावना या गोष्टीपेक्षा निसर्गसौंदर्याचा आविष्कार व्यक्त करण्यात गुंतलेली दिसते. निसर्गाच्या माध्यमातून कवी प्रेम, नाजूकता, हळूवारपणा व्यक्त करताना दिसतात.

कवी ना. घ. देशपांडे निसर्गात चालू असलेली हालचाल कवितेत अचूक टिपतात. काळ्या रात्रीचे, गढीचे, रानोवन भटकत फिरणाऱ्या वादळवाऱ्याचे अवखळ चित्र ते रेखाटतात. त्यांच्या कवितेत येणारा निसर्ग मुक्त असा आहे. कवितेत येणाऱ्या निसर्गामधून शृंगार, कारूण्य, हर्ष, विस्मय अशा विविध रसांचा परिपोष होतो. निसर्ग रसाचे परिपोषपण कसे करतो हे 'निश्वास गीतावली' मधील लहान मुलांच्या शोकातील कारूण्यातून व्यक्त होते. निसर्गाच्या साहाय्याने कवीने लहान मुलाची कारूण्यता दाखविली आहे. ते पुढील प्रमाणे सांगता येईल.

उदा.:

' सुटे वात बेफामसा वादळी, हाय, वात्सल्यवेली तुटोनी पडे !
गळाली फुले कोवळी सात बाळे : बघावे तये, हाय, कोणाकडे !'

(नि:श्वास गीतावली, पृ.क्र. २७)

वरील ओळीत करुण रस ओतप्रोत भरलेला दिसतो. याचप्रमाणे इतर कवितेच्या द्वारे निसर्गातून व्यक्त होणाऱ्या मानवी भावभावना सांगता येतील. कवीने 'शीळ' व 'कंचनीचा महाल' या दोन्ही काव्यसंग्रहातील कवितेत निसर्गाला बरेच प्राधान्य दिल्याचे दिसते. कवितेन येणारी विविध पात्रे निसर्गसान्निध्यात सतत वावरत असलेली दिसतात. कवी प्रेयसीचे सौंदर्य, आईची वात्सलता, 'कंचनीचा महाल' मध्ये येणारी अद्‌भूतता, गिरिजेचा शृंगार हे सर्व निसर्गाची मदत घेऊन व्यक्त होताना जाणवतात. निसर्गातील जड पदार्थाचे मानवीकरण झाल्याचे कवितेन दिसून येते. कवी ना. घ. देशपांडे यांची कविता निसर्गात उमलत जाताना दिसते तर कधी कवी निसर्गाचा सूचक म्हणून देखील वापर करतो.

शेवटी असे सांगता येईल की, ना. घ. देशपांडे यांच्या कवितेत येणारा निसर्ग व त्यातून व्यक्त होणाऱ्या भावभावना वेगळ्या करणे अशक्य होऊन जाते एवढा निसर्ग त्या भावभावनांशी एकरूप होताना जाणवतो.

## ०३. प्रायोगिक रचना :

कवी ना. घ. देशपांडे यांनी आपल्या 'शीळ' काव्यसंग्रहातील कवितेत विविध जातीवृत्ताच्या वापराबरोबर मुक्तछंदाचा वापर केल्याचे दिसते. सुरुवातीच्या काळात त्यांनी १९२९ मध्ये 'शीळ' ही आपली पहिली कविता लिहिली. त्यामध्ये त्यांनी जातीवृत्ताचा वगैरे विचार केलेला दिसत नाही. मात्र पुढच्या काळात काव्यलेखन करताना वृत्ताचा वापर त्यांच्या काव्यात आलेला दिसतो. त्यांच्या अनेक कवितेत मुक्तछंदाचा वापर झाला आहे. याबाबन सुषमा करोगल आपल्या लेखात म्हणतात - ''खरे म्हणजे अनिलांनी मुक्तछंद १९३५ मध्ये आणला; पण त्या आधीच ना. घं. नी त्या दिशेने प्रयत्न सुरू केले होते. १९३४ च्या सुमारास 'विहंगम' मासिकात त्यांनी या संबंधात लेखही लिहिला होता.''[४] येथे कवी ना. घ. देशपांडे कवी अनिलांच्या अगोदर कवितेत मुक्तछंदाचा वापर करीत असल्याचे लक्षात येते. येथे त्यांची काव्यातील प्रायोगिकता दिसून येते.

इ.स. १९३४ मध्ये कवी ना. घ. देशपांडे यांनी 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात आलेली 'जुईची कळी' ही कविता लिहिली. मराठी कवितेत 'व' हा शब्द आतापर्यंत कधीही कवींनी आणला नव्हता. पण कवीने आपल्या कवितेत आणलेला दिसतो. रामा व ऽ गोविंदा असा दुहेरी उच्चार करून 'व' हा उभयान्वयी शब्द कवितेत त्यांनी आणला, त्याचबरोबर गद्यातील उतारे, वाक्ये वाचताना शब्दातील अंत्य 'अ' चा उच्चार केला जात नाही पण कविता वाचताना शब्दातील अंत्य 'अ' चा उच्चार केला जातो. हा उच्चार कवीने कवितालेखनात अक्षर प्लुत करून आणला आहे व येथे ऱ्हस्व किंवा दीर्घ म्हणण्याचा प्रकार ठेवला नसून जसे आहे तसे उच्चारणावर भर दिला आहे.

उदाहरण: 'पुढील भविष्य बघून मी तुला म्हणालोही
सखे, परंतू पुढे अडथळे पहा काही !
भरून जुळी नयनें संथ पण धिटाईने
तरी पुन्हा अनुकार तूं दिला, दिला मीही ''

(जुईची कळी, पृ.क्र. ३९)

हेच कडवे 'जुईची कळी' या कवितेत खालीलप्रमाणे रचना करून मांडले आहे.

'पुढील् भविष्य बघून् मी तुला म्हणलोंही,
सखे, परंतु पुढें अड्थळे पहा कांही !'
भरून् जुळी नयनें संथ पण् धिटाईने
तरी पुन्हा अनुकार् तूं दिला, दिला मीही.'

(जुईची कळी, पृ.क्र. ३९)

अशाप्रकारे या कवितेत कवीने 'अगोट्' वृत्ताचा वापर करून प्लुत कायम ठेवले आहेत. येथे कवितेची रचना गद्याप्रमाणे असल्याचे दिसते. त्यांच्या ह्या रचनेबाबत स्वत: 'आवडीचे फूल' या मुलाखतीत सांगतात - ''कवितेतील गद्योच्चारी लय हीही माझ्या इंग्रजी कवितेच्या प्रत्यक्ष वाचनाच्या परिणामातून आलेली आहे''[५] असे त्यांनीच स्पष्ट केले आहे.

कवीने मराठी गद्याच्या लेखनाप्रमाणे कवितेत लघुगुरू मानून आपल्या कवितेची रचना केली आहे. हे त्यांच्या कवितेचे नावीन्य म्हणावे लागेल. त्यांनी कवितेत आणलेली प्रायोगिकता मात्र पुढच्या काळात टिकाव धरू शकली नाही. काव्यातील ह्या नवप्रयोगाला इतर कवींकडून प्रतिसाद न मिळाल्याने हा प्रयोग मागे पडला. त्यामुळेच याबाबतचे 'प्रवर्तनाचे जे सोहळे कविवर्य ना. घ. देशपांडे यांना प्राप्त व्हावयास हवे होते ते अनिलांच्या हवाली झाले आहेत.''[६] हे कवी ग्रेस यांचे मत योग्य वाटते. कवी ना. घ. देशपांडे यांनी मराठी काव्यात काही ऐतिहासिक महत्त्वाच्या गोष्टी केल्यात. त्यांनी काव्यात आणलेली नवी रचना पध्दती महत्त्वाची वाटते. याबाबत 'खूणगाठी' काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत ते स्वत: सांगतात, ''या नव्या पध्दतीत कमी स्वरसंख्येत जास्त अर्थ येतो, म्हणजे कवितेची भाषा जास्त सकस होते. प्लुतांचे 'अ' कार गेल्याने, स्वरसंख्या कमी झाल्याने असे होते; शिवाय निरनिराळे भाव व्यक्त करण्याला आवश्यक व निवडक शब्दाचा उपयोग व भावामुकूल शब्दक्रम करायलाही मदत होते.... यातही ढोबळमानाने मात्रांचे गण पडतात व लय उत्पन्न होते. काही ओळी आखूड तर काही लांब होतात. भावनेच्या ओघाप्रमाणे असे होते. बोलण्याच्या उच्चाराप्रमाणे लघु-गुरू धरावे लागतात. लेखनाप्रमाणे नाही. यमक व अनुप्रास आपोआप येतात; मुद्दाम करावे लागत नाही.''[७] जुन्या व नव्या काव्यातील रचनापध्दतीतील तफावत कवीने अचूकपणे सांगितल्याचे येथे दिसते.

'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहातील 'कंचनीचा महाल' या कवितेत कवीने लघुगुरू भेदातील नवीन अक्षरछंद वापरून दहा ओळीच्या एकेका कडव्याची रचना केली आहे. शेवटच्या दोन ओळीत कलाटणी किंवा तीव्रोद्रेक जाणवेल अशी रचना केली आहे. ही कविता साधी तालात वाचता येते व गायनाला अनुकूल अशी आहे. 'नि:श्वास गीतावली' ही मराठीतील सर्वात मोठे व पल्लेदार वृत्त सुमंदारमाला यात लिहिलेली असून ही विलापिका युरोपीय संकेतानुसार न लिहिता देशीय परंपरेशी नाते ठेवून रचनाबध्द केली आहे. युरोपीय संकेताचा वापर जर या कवितेत केला असता तर ही कविता आपल्या जीवन परंपरेत व इतिहासात बसली नसती, असे कवीला वाटते.

अशा प्रकारे कवी ना. घ. देशपांडे यांनी मराठी काव्यरचनेत नावीन्यपूर्ण प्रयोग करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

## ०४. प्रादेशिकता :

मराठी साहित्यामध्ये कथा आणि कादंबरी या वाङ्मयप्रकारामध्ये प्रादेशिकतेचे काही वैशिष्टये असणारे घटक आहेत. पण याला सुध्दा थोड्या प्रमाणात काव्य हा वाङ्मय प्रकार अपवाद नाही. कथा आणि कादंबरीमध्ये प्रदेशाचे प्रतिबिंब सहज उमटलेले दिसते. तसेच कवितेमध्ये सुध्दा कवीच्या अनुभूतीचा जो प्रदेश आहे त्याचे प्रतिबिंब त्याच्या काव्यात नकळत पडलेले दिसते. कवी बा. भ. बोरकर यांच्या काव्यात कोकणचा निसर्गरम्य प्रदेश प्रामुख्याने आल्याचे दिसतो. बहिणाबाईच्या काव्यात खानदेशचा परिसर, तेथील राहणीमान, लोकजीवन रितीपरंपरा आल्याचे दिसते, तर ग. दि. माडगूळकर यांच्या काव्यातून माणदेशचा प्रदेशाचे चित्रण येते. यातून कवी व तेथचा प्रदेश यातील दृढ नाते लक्षात आल्यावाचून राहत नाही.

कवी ना. घ. देशपांडे पश्चिम विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील ता. मेहकर येथे वास्तव्याला असल्याने त्यांच्या कवितेत त्या विशिष्ट परिसराचा, तेथील निसर्गाचा, देवदेवतांचा, बोलीभाषा, रितीरिवाज-परंपराचा त्यांच्या कवितेत समावेश झालेला आहे. त्यांच्या 'शीळ' व 'कंचनीचा महाल' या दोन्ही काव्यसंग्रहात प्रादेशिकतेच्या खाणाखुणा उमटलेल्या दिसतात.

विदर्भात 'उन्हाळा' हा ऋतू अतिशय कडक असतो. कवी ना. घ. देशपांडे 'शीळ' काव्यसंग्रहातील कवितेत 'उन्हाळा उष्ण आहे फार' (पृ.क्र. ८२) असा उल्लेख कवी करतो. येथे कडक उन्हाळ्याची जाणीव 'माझी गाणी' या कवितेत कवीने करून दिल्याचे दिसते. या प्रदेशात पावसाचे प्रमाण कमी असल्याने कमी पाण्यावर टिकाव धरणारी झाडे येथे जगताना दिसतात. बाभळी, निंब अशी कमी पाणी लागणारी झाडे येथे संख्येने जास्त आढळतात. कवीच्या 'समाधी' कवितेत बाभळीच्या वृक्षाचा उल्लेख येतो. त्याचबरोबर

'हिरवा पिवळा फुटला होता आंब्यावर मोहर
निंबावरती होता ढवळा लवलवता फुल्वर' (गिरिजेचा संसार पृ. क्र. १५)

वरील कडव्यात आंबा, निंब या झाडाचा त्याचबरोबर अन्य कवितेत निशिगंध, पळसफुल, जुईची कळी या फुलांचा उल्लेख येतो.

'कंचनीचा महाल' या कवितेत 'कंचनीचा महाल' या जून्या वास्तूचे वर्णन आले आहे. ही वास्तू पैनगंगा नदीच्या काठावर वसलेली आहे. 'कंचनीचा महाल' ही वास्तू प्रादेशिक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. त्याचबरोबर 'गिरिजेचा संसार' या कवितेत 'गिरिजा' पहिल्या कडव्यात आपण अंजिठ्याच्या घाटातील असल्याचे सांगून आपला परिचय करून देते. त्याचबरोबर या कवितेत विदर्भातील पिकांचे उल्लेख आलेले आहेत. येथील काळ्या रेगूर मृदेत पऱ्हाटी, तूर, हरबरा, गहू ही पिके उत्तम येतात. ही पिके या प्रदेशाचे वैशिष्ट्य होय.

'दाट पऱ्हाटी, लवलवणारी अन् रांगेनं तुरी....'

(गिरिजेचा संसार पृ. क्र. ११)

अशाप्रकारे महत्त्वाच्या पिकांचा उल्लेख कवितेत येतो. लोणारच्या परिसरात काही भागात बागायतो शेती केल्या जातात. त्यात केळीचे पिक घेतले जाते. केळीच्या पिकाचा उल्लेख 'गिरिजेचा संसार' या कवितेत आलेला आहे.

'शीळ' काव्यसंग्रहातील 'सुगी' या कवितेत 'पूर्णा' नदीचा उल्लेख येतो. पूर्णा ही नदी विदर्भात महत्त्वाची मानली जाते. या नदीला धार्मिक दृष्ट्या अधिक महत्त्व येथचे लोक देतात.

'पूर्णेच्या पाण्यामधी पार नाहिला
येऊन दया देवानं ऽ हा दिला कौल चांगला'

(सुगी, पृ.क्र. ३१)

पूर्णा नदीला पूर येऊन आजुबाजूचा काठ ओला होणे हा देवानं दिलेला समृध्दीचा कौल आहे असे येथचे लोक मानतात. यातून प्रादेशिक विशेष समोर येतात.

बोलीभाषा हा प्रादेशिकतेमध्ये येणारा घटक होय. बुलढाणा परिसरातील बोलीभाषा कवीच्या कवितेत आलेली दिसते. उदाहरण 'कंचनीचा महाल' मध्ये लय् , पोरं , मा-बापाच्या (१२), पल्याड (६), सरावण (१५) पुनव (८) यातून त्या प्रदेशाची ग्रामातील बोलीभाषा

प्रकर्षाने समोर येताना दिसते. या भागातील लोक नियमाने देवधर्म करतात. त्यामुळेच मेहकरच्या परिसरात विष्णू, महादेव, शंकर-पार्वती यांची अधिक देऊळ असल्याचे दिसते. व त्यावरूनच कवीच्या काव्यात कलावती, सांब, शंकर, मोहन-कान्हा या प्रतिमा अधिक आल्याचे लक्षात येते. 'गिरिजेचा संसार' या कवितेत पती, सासू-सासरा, नणंद, आई-बाप यांच्या स्वभावाचे, राहणीमानाचे पोशाखाचे वर्णन आले आहे. यातून विदर्भातील मध्यमवर्गीय लोकांचे जीवनमान कसे आहे हे स्पष्ट होते. येथील बहुतेक लोकांचे कुलदैवत अंबाईदेवी आहे. या देवीचे मंदिर अमरावती जिल्ह्यात आहे. व्यक्ती ज्या परिसरात राहतो त्याच परिसरात शक्यतो त्याचे कुलदैवत असते असे येथे दिसून येते. लोणार सरोवरच्या काठावर असलेल्या कमलजा देवीचा संदर्भ 'कंचनीचा महाल' या कवितेत येतो. येथील हवामान उष्ण व कोरडे असल्याने निरभ्र आकाश व रात्रीचा स्वच्छ चांदणे दिसते. म्हणूनच कवीच्या काव्यात चंद्र, चांदण्या, निळे आकाश, रजनी यांचे अधिक उल्लेख आल्याचे दिसतात. जुने मोठमोठे वाडे हे या प्रदेशाचे विशेष म्हणावे लागेल. याचा उल्लेख कवीच्या काव्यात आलेला दिसतो.

अशाप्रकारे 'शीळ' व 'कंचनीचा महाल' या दोन्ही काव्यसंग्रहात प्रादेशिक वैशिष्टये जाणवतात.

## ०५. गेयता :

गेयता हा ना. घ. देशपांडे यांच्या काव्याचा महत्त्वाचा गुण आहे. त्यांच्या 'शीळ' व इतर काव्यसंग्रहातील बहुतेक कविता गेय स्वरूपाच्या असलेल्या दिसतात. १९३० ते ४० च्या दशकात कवी यशवंत, कवी गिरीश, ग. ल. ठोकळ, ग. ह. पाटील, सोपानदेव चौधरी व अन्य कवींनी गेय कविता रचनेत भरघोस प्रयत्न केले आहे. या सर्व कवींच्या कवितेपेक्षा ना. घ. देशपांडे यांच्या कवितेने आपले वेगळेपण जपलेले दिसते. या कवीची कविता तिच्यात असलेल्या गीतगुणांनी गेय होऊन गीत बनते. मुद्दामहून यमक जुळवून ते कविता गेय बनवित नाहीत. याबाबत अशाचप्रकारचे मं. वि. राजाध्यक्ष यांचे मत पाहता येईल. ते म्हणतात, ''ना. घ.

देशपांडे प्रथम कवी आणि नंतर गीतकार; कारण त्यांनी गायकाच्या गळ्यावर आपल्या कविता बेतल्या नाहीत, तर त्यांतील गीतगुणांनी गायक तिकडे ओढला गेला''[८] त्यांच्या काव्यात नाद, लय, ताल, सुरेलपणा असे गीतगुण येत असल्याने काव्याचे गीतात सहज रूपांतर होते. म्हणूनच जी. ए. जोशी, उषा अत्रे, कृष्णा कल्ले आदींनी त्याच्या कवितेचे गाण्यांत रूपांतर करून त्यांच्या ध्वनिमुद्रीका केल्याचे दिसतात.

कवी ना. घ. देशपांडे यांच्या गेय कवितेवर कविवर्य भा. रा. तांबे यांच्या गेय काव्याचा प्रभाव दिसून येतो. कवी त्यांचा चालत आलेला गीतसंप्रदाय पुढे चालविताना दिसतात. कवीच्या काळात कविता गायन करून म्हटल्या जायच्या. त्यामुळे कवितेच्या गेयतेला अधिक महत्त्व प्राप्त झालेले दिसते. कवी ना. घ. देशपांडे यांनी आपल्या कवितेत विविध जातीवृत्ताचा वाप्र केला आहे. या जातीवृत्तातून कविता लवकर गेय रूप धारण करते. त्यांची कविता वृत्तबध्द आहे. त्याचबरोबर त्यांनी मुक्तछंदाचा देखील काही कवितेत वापर केल्याचे दिसते. त्यांनी आपल्या कवितेत यमकाचा अचूक वापर केल्याने काव्यात गेयता येताना दिसते. यमकाशिवाय त्यांची कविता सापडणे कठिण.

उदाहर: 'ये जरा जवळ, राजसे ग ऽ !
ये जरा जवळ, राजसे ग ऽ !
मी तुझा सजण सावळा
अन् तुझी चांदणी कळा
चल, फिरू बरोबर, असे ग ऽ !

(ये जरा जवळ, राजसे ग ऽ ! पृ.क्र. ३६)

अशाप्रकारे वरील कवितेत 'राजसे गऽ - राजसे ग ऽ' त्याचबरोबर 'सावळा-कळ' अशी यमके साधल्याने लय, ताल निर्माण होऊन कविता गेय होते व त्यातून गीताची निर्मिती होते. गानसम्राज्ञी लता मंगेशकर 'रंग माझा वेगळा' या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत गेयतेचे महत्त्व सांगताना म्हणतात - ''काव्य आणि गीत यांना जोडणारा धागा गेयता हाच आहे.''[९]

यावरून काव्याचे गीतात रूपांतर होण्यासाठी गेयता किती महत्त्वपूर्ण आहे. याची येथे जाणीव झाल्यावाचून राहत नाही.

गेय कविता ही सहज, सूचक कलात्मक असते. त्याचबरोबर ती नितळ स्वरूपाची असून 'पारदर्शकता' हे गेय कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य त्यात असते. गेयकवितेतून प्रामुख्याने कवी मनातील भाव व्यक्त होताना दिसतात. उदाहरण -

'चंद्र बुडत असतांना ये तूं
वर असतांना मोहक तारे
जग निजले असतांना ये तूं
दाट धुके पडल्यानंतर सारें.' (मनोगत, पृ.क्र. ४७)

या वरील कवितेत सहजता, सोपेपणा असून प्रियकराकडून प्रेयसीसाठी भावनिक आवाहन असल्याचे दिसते. ही कविता नितळ स्वरूपाची असून 'पारदर्शकता' हा गुण त्यामधून प्रतिबिंबीत होतो. म्हणून ही कविता गेय म्हणता येईल. गेयतेमुळे मूळ वस्तूच्या सौंदर्यात कितीतरी पटीने वाढ होते. काव्याचे वेगळेपण प्रामुख्याने गेयतेमुळे जाणवते. गेयता हा मूळ काव्यानुभवाचा अंग जोपर्यंत कवितेत असणार नाही तोपर्यंत ती कविता गीत बनणार नाही. 'शीळ' काव्यसंग्रहातील 'शीळ' 'नदीकिनारी', 'आता' या कविता उत्कट असून भावनिक आवाहन करणाऱ्या आहेत. त्यामुळे त्या कविता गीत बनल्याचे दिसतात. डॉ. सयाजीराव मोकाशी आपल्या 'मराठी गेय कविता' या पुस्तकात म्हणतात - ''गीतात सहज स्थलांतरीत होणारी गेयकविता उत्कट असते, तिच्यात भावनिक आवाहन असते व सार्वत्रिक नैतिक प्रामाण्याचा त्यात अधिक वापर होत असतो.''[१०] कवी ना. घ. देशपांडे यांची कविता वरील मताशी साम्यता दर्शविते असे लक्षात येईल.

कवी ना. घ. देशपांडे यांच्या काव्यात येणारी गेयता ही लोकगीतांतून, लावणी वाङ्मयातून व वडिलांच्या भजन गाण्याच्या संस्कारातून आल्याचे दिसते. त्यांच्या 'शीळ' काव्यसंग्रहात प्रामुख्याने 'शीळ' (पृ.क्र. २५), 'तुझ्या माझ्यांत ग ऽ' (पृ.क्र. २७), 'मालन'

(पृ.क्र. २९), 'येथील का रे ?' (पृ.क्र. ३३), 'मोटकरी' (पृ.क्र. ३८), 'आता' (पृ.क्र. ५७), 'रंकाची राणी' (पृ.क्र. ५६), 'हुरहूर' (पृ.क्र. ६९), 'कधी रे आता' (पृ.क्र. ९०) इत्यादी अशा अनेक कविता गेय असल्याचे सांगता येईल.

त्याचप्रमाणे 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहातील 'कंचनी महाल' ह्या पहिल्या कवितेत कवीने नवीनच अक्षरछंद वापरला आहे. तो लघु-गुरू भेदातील आहे. तीन अक्षरांचा एक गण असे सहा गण व शेवटी दोन अक्षरी खंडित गण यात आलेला आहे. यावरून ही कविता साधी तालात वाचता येते व ती गायनाला अनुकूल गेय स्वरूपाची आहे असे म्हणता येईल.

कवी ना. घ. देशपांडे यांच्या काव्यात स्वरलालित्य साधले आहे. कवितेत काव्य, चित्र आणि संगीत यांचा सुंदरपणे मिलाफ झालेला दिसतो. त्यांची वृत्तबध्द कविता गेयतेशी नाते जोडणारी आहे. बऱ्याच कवितेत नाद, लय आणि भावना यांची तिहेरी वीण आल्याचे दिसून येते. त्यांच्या कवितेबाबत शि. गो. देशपांडे यांनी 'ललित' साठी एप्रिल १९८४ मध्ये घेतलेल्या मुलाखतीत स्वत: ना. घ. देशपांडे म्हणतात - ''माझ्या कवितेच्या निर्मितीत मनातला नाद आणि लय आणि भावनेचे स्वरूप यामुळे गीतगुणाची कविता झाली असावी.''[११]

त्यांचे स्वकवितेविषयीचे त्यांनी मांडलेले मत योग्य वाटते. कवी ना. घ. देशपांडे यांना गेयकवितेने लोकप्रियता मिळाली. त्यामुळे त्यांचा बा. भ. बोरकर, ना. घ. देशपांडे, मंगेश पाडगावकर असा समधर्मी गीतकाराचा क्रम लावल्यास वावगे ठरणार नाही.

## ०६. प्रसंगवर्णनातील चित्रमयता :

कवी ना. घ. देशपांडे यांच्या 'शीळ' व 'कंचनीचा महाल' ह्या दोन्ही काव्यसंग्रहात बऱ्याच प्रमाणात चित्रमय वर्णन आलेले दिसते. एखादा प्रसंग, घटना काव्यातून वाचताना वाचकाच्या डोळ्यासमोर हुबेहुब त्या प्रसंगाचे चित्र उभे राहते. त्यांच्या कविता ह्या चलचित्रपटाप्रमाणे आहेत. कविता वाचताना रसिक वाचक त्या घटनेशी समरस होतो व ती कविता वाचकाच्या मनावर विशेष प्रभाव टाकून जाते म्हणून कवी ना. घ. देशपांडे यांच्या

काव्याचे चित्रमयप्रसंग वर्णन हे विशेष मानावे लागेल. काव्यात निर्माण होणारी चित्रमयता किंवा नाट्यमयता आपणाला 'हसेल रे जग' या कवितेतून पुढीलप्रमाणे सांगता येईल.

'लगबग लगबग

लगबग लगबग

चल लगबग, सजणा !

.....................

फारच आता उशीर झाला

लवकर ने रे परत घराला !

करते तगमग

करते तगमग

चल लगबग, सजणा !' ('शीळ', 'हसेल रे जग', पृ.क्र. ८६)

वरील कवितेत प्रियकरासोबत बाहेर फिरायला गेल्यानंतर परत येत असताना वारा-वादळाने कशी धांदल उडविली त्याचे वर्णन आले आहे. प्रेयसीच्या मनातील अनामीक भिती व निसर्गाचे रूप यांची गुंफण या कवितेत आली आहे. ही कविता वाचताना डोळ्यासमोर हा प्रसंग साकार होतो. 'मी भिजते बघ, मी भिजते बघ' हे तिचे भिजण्याचे निवेदन वातावरणाला सत्यसृष्टीचा चित्रमय आभास निर्माण करून देते. चित्रमय, नाट्यमय त्याचबरोबर गतिमान स्वरूपाची ही कविता वाचकाच्या मनाला मोहित करते. शिवाय कवितेत सुसंगतपणा असल्यामुळे कवितेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या कवितेप्रमाणेच 'शीळ' काव्यसंग्रहातील 'काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे' (पृ.क्र. ७९). 'तूं' (पृ.क्र. ९२), 'फार नको वाकू' (पृ.क्र. ७०), 'नदीकिनारी' (पृ.क्र. ५९), 'समाधि' (पृ.क्र. ५१) ह्या काही प्रमुख कविता सांगता येतील. चित्रमयता व नाट्यात्मकता या कवितेत आल्याचे दिसते.

'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहातील असलेल्या चारही कविता चित्रमयप्रसंग वर्णन करणाऱ्या आहेत. 'कंचनीचा महाल' या कवितेत 'कंचनी' ही नायिका आपल्या जीवनाची

कथा रस्त्यावरील वाटसरूला सांगते. त्याचबरोबर दुसऱ्या कवितेत गिरिजा आपल्या सांसारिक जीवनाची कथा पथिकासमोर मांडते. दोन्हीही कवितेत उत्कृष्ट चित्रमयता आलेली आहे. गिरिजेच्या विवाहाचे वर्णन, लग्न झाल्यानंतर पाठवणीच्या क्षण वर्णनाच्या दृष्टीने येथे पाहता येईल.

चौ दिवसांनी, सख्या, संपला लगिनाचा सोहळा;
पाठवणीच्या घडी जीव हा हुरहुरला कोवळा.
ओटी भरतां भरतां भरला माझा गळा
जवळच होती सासू माझी : माय म्हणाली तिला
..........................................
दमनी निघतां तिनं ऽ लावला या ओठांना गडू :
नजर लागली तिच्याकडे अन् फुटून आलं ऽ रडूं.'

('गिरिजेचा संसार', पृ.क्र. १५)

वरील कडव्यातून सासरला चाललेल्या गिरिजेच्या मनाची भावविव्हलस्थिती, त्याचबरोबर तिच्या आईची तिच्यावरील माया, आईने नवऱ्या मुलाच्या आईला केलेली विनवणी भावनोत्कट वाटते. कवी गिरिजेचा सासरला पाठवणीचा क्षण हुबेहुब रेखाटतात. आलेले वर्णन डोळ्यासमोर तरळतांना दिसते. त्याचप्रमाणे कवी 'निःश्वास गीतावळी', 'कंचनीचा महाल', 'जुईची कळी' या कवितेतील प्रसंगाचे हुबेहुब चित्र वाचकाच्या नजरेसमोर साकार करतात. अनुभवातले नाट्य हेरणे हे कवीच्या काव्यप्रकृतीचे महत्त्वाचे वैशिष्टय वाटते. म्हणून चित्रमयप्रसंगवर्णन हे ना. घं. च्या काव्याचे विशेष मानावे लागते.

## ०७. शैली :

कोणताही साहित्यिक आपल्या शैलीपासून दूर राहू शकत नाही. प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे त्याचे शैलीत प्रतिबिंब पडलेले असते. ते त्याचे खास वैशिष्टयच असते. त्यातून त्याच्या

स्वभावाचे नकळतपणे दर्शन होते. कवी ना. घ. देशपांडे आपल्या काव्यलेखनासाठी साधी, सरळ, सोपी भाषाशैली वापरताना दिसतात. 'शीळ' काव्यसंग्रहात येणाऱ्या सर्व कविता समजायला सोप्या आहेत. मात्र 'कंचनीचा महाल' या काव्यसंगहातील कवितेत आलेल्या कठीण शब्दांमुळे काव्याचा अर्थ उमगण्यास थोडा कालावधी लागतो. पण या कवितेची पार्श्वभूमी लक्षात घेऊन कविता वाचन केल्यास कविता सहजपणे उमगते. त्यांच्या कवितेत अभिव्यक्तीला कल्पनाविलासाबरोबरच वास्तवतेची जोड दिलेली दिसते. कविता वाचताना कवीच्या अंगी असलेला प्रचंड शद्बसाठा दिसून येतो. योग्य ठिकाणी नेमका शब्द ते योजतात. हे त्यांच्याजवळ शब्द भांडार असल्याचे द्योतकच आहे. कवी ना. घ. देशपांडे आपल्या कवितेत प्रमाणभाषेबरोबरच संस्कृत व ग्रामीण बोलीभाषेचा सुबक वापर करतात.

उदाहरण : 'निळी निळी रजनी : भोवती रूपेरी धूर् :
तिने भरून् सुरई वर्षला सुधेचा पूर्
पिऊन् तशी मदिरा धुंद तर्र होतों मी;
सदैव शांत तरी धुंदला तुझाही नूर्'

(कंचनीचा महाल, पृ.क्र. ३९)

वरील कडव्यात 'रजनी', 'मदिरा' इत्यादी संस्कृत शब्दाचा वापर केल्याचे दिसते. त्याच कडव्यात संस्कृत भाषेबरोबरच खास ग्रामीण बोलीतील शब्द येतात व कडव्याची भाषा ही प्रमाणभाषेच्या जवळ जाणारी दिसून येते. यावरून बोलीभाषा, प्रमाणभाषा व संस्कृत शब्दाचा वापर कवी सुबकपणे करतात. 'कंचनी महाल' या काव्यसंग्रहाबरोबरच त्यांच्या 'शीळ' मधील कवितेत देखील ग्रामीण बोलीतील शब्दाचा वापर प्रकर्षाने दिसून येतो. जानपदगीते तर पूर्णत: बोलीभाषेत आल्याचे दिसतात. संस्कृत व मराठी भाषेतील शब्दांचा कवी आपल्या कवितेत मिलाफ घडविताना दिसतात. वातावरण प्रसन्नमय करण्यासाठी परिणामकारकतेत वाढ करण्यासाठी तर कधी रसाच्या ओघात क्लृप्तीने कवी संस्कृतप्रचूर शब्दांचा कवितेत समावेश करून घेतात असे दिसते. याबाबत मं. वि. राजाध्यक्ष 'शीळ' काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात

- ''ना. घ. देशपांडे यांनी मुख्यत: जिवंत बोलीतून आपली 'शैली' बांधलेली असली तरी ठायी ठायी, विशिष्ट अर्थच्छटा दाखवण्यासाठी तर कधी रसाच्या ओघात, संस्कृत शब्दाचा वापर विनासायास केला असे दिसते.''[१२]

कवी ना. घ. देशपांडे यांच्या काव्यात बोलीभाषेचा सुंदर आविष्कार झालेला दिसतो. आपल्या मनातील आशय व्यक्त करण्यासाठी त्यांना बोलीभाषा जवळची वाटत असावी असे आपणास म्हणता येईल. त्यांचे ग्रामीण भागात बालपण, शिक्षण झाल्याचे व त्याच परिसरात कायमचे वास्तव्य असल्याने 'पुनव', 'नवरी', 'लयू', 'पोर', 'माय', 'कळशी', 'राहयलं', 'चंदिर'. 'बाळीला', 'फुल्वर', 'समदे, 'गोरेली' अशाप्रकारचे बोलीभाषेतील शब्द त्यांच्या काव्यात सहजपणे प्रवेश करतात. त्यांच्या काव्याने ग्रामीण बोलीतून ग्रामीण शृंगार वर्णन केल्याचे 'कशाला, सखू रूसावं ऽ तरी !' (पृ.क्र. ७२), 'गरगरा फिरे भिंगरी' ( पृ.क्र. ४४), 'नदीकिनारी' (पृ.क्र. ५९) तसेच 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहातील 'गिरिजेचा संसार' (पृ.क्र. ११) या कवितेतून दिसून येते.

कवी ना. घ. देशपांडे यांच्या काव्यशैलीवर विविध संस्कार झाले आहेत. त्यांच्या काव्यावर वडिलांच्या संस्कारातून संतकाव्याचा थोडा परिणाम दिसून येतो. त्याचबरोबर लोकगीते व लावणी वाङ्मय यातील रसरशीतपणा त्यांच्या काव्यात आवर्जुन आल्याचे दिसते. त्यांच्या 'शीळ' काव्यसंग्रहातील काही कविता सुनीत असल्याप्रमाणे भासतात. मात्र ते सुनीत या काव्यप्रकारात मोडत नाही. 'शीळ' काव्यसंग्रहातील कवितेत अल्पाक्षर रमणीयत्व असल्याचे दिसते. कविता आकाराने लहान असल्यातरी आशयाचे अधिकाधिक गर्भीत असल्याचे दिसतात. त्यांची 'तुम्ही' (पृ.क्र. २८) ही कविता चार ओळींची असली तरी त्यामधून आविष्कृत होणारा आशय हा दीर्घस्वरूपाचा असल्याचे दिसेल. कवींना लय, ताल, नाद, छंद या गोष्टीचे विलक्षण आकर्षण आहे. प्रादेशिकतेचे छटा दाखविणारे काही शब्द उदा. आयने, मा-बापाच्या, लयं, राहयलं, करून राहिलो इत्यादी कवितेत आल्याचे दिसतात. कवितेत वैदर्भी भागातील बोलीतील, प्रादेशिक व अनोळखी शद्ब येत असली तरी त्यामुळे त्याची कविता क्लिष्ट होत

नाही. महाराष्ट्रातील कोणत्याही कानाकोपऱ्यात सहज उमगेल अशी त्यांची कविता आहे. कवीच्या काव्यात येणारा शब्द त्यांच्या मनातून उमटल्यासारखा वाटतो. ओढून ताणून शब्द आणून कवितेत त्याची रचना केलेली दिसत नाही. कवी आपल्या कवितेत पौराणिक काव्याप्रमाणे 'राधा-कृष्ण', 'मोहन-कान्हा', 'लीलावती', 'उमा-गौरी', 'सांब' या देवदेवतांचा प्रतिमा म्हणून वापर करतात. पण त्यामुळे त्यांची कविता पौराणिक स्वरूपाची आहे असे नाही.

कवी ना. घ. देशपांडे यांची प्रत्येक कविता नाजूक, हळूवार, मनाला स्पर्श करणारी अशी आहे. कवीने आपल्या काव्यात, प्रत्येक कडव्यात यमक साधल्यामुळे त्यांचे काव्य गोड बनले आहे. उत्कृष्ट शब्दरचना, प्रमाणभाषेजवळ जाणारी भाषा यामुळे त्याचे काव्य सहज उलगडेल असे आहे. कमीत कमी शब्दाच्या जोरावर जास्त आशय सामावण्याची शैली त्यांच्या 'शीळ' काव्यसंग्रहात आल्याची दिसून येते. त्याचबरोबर दीर्घ स्वरूपाच्या काव्यात एकच एक प्रसंग उत्कटतेने रंगविण्याची, तोचतोपणा, पाल्हाळ न येवू देता घटना सजविण्याची त्यांची शैली महत्त्वपूर्ण व आकर्षक ठरते. त्यांची कविता गद्यप्राय वाटत असली तरी ती त्याप्रमाणे नाही.

कवी ना. घ. देशपांडे यांची काव्यशैली भारदस्त स्वरूपाची असल्याचे दिसते. त्यांच्या या शैलीबाबत बोलताना मं. वि. राजाध्यक्ष म्हणतात - ''कविता म्हणजे कृत्रिमता, हरघडीच्या जीवनापासून दूर ठेवलेला कसलातरी 'पवित्र', उद्योग, हा पिढ्यानूपिढ्या आपल्या कुशिक्षणाने मनात भरविलेला भास असल्या शैलीने कमी होईल. असे अनेक वातड ग्रह आणि कोत्या कल्पना खिळखिळ्या करण्याचे सामर्थ्य ना. घ. देशपांड्याच्या काव्यात आहे.''[१३] येथे मं. वि. राजाध्यक्ष यांनी ना. घं. च्या काव्यशैलीचे केलेले मूल्यमापन उचित असलेले दिसते.

कवितेत येणारे शब्द सहजरूपाने आल्याचे दिसते; हे त्यांच्या शैलीचे विशेष म्हणावे लागेल. त्यांच्या 'शीळ' काव्यसंग्रहात जीवनाचा उल्हास व्यक्त करणारी, अवखळ नादमधूर शैली स्पष्टपणे दिसते. प्रत्येक कवितेचा रचनाबंध भिन्न स्वरूपाचा व विशेष वाटतो. त्याचबरोबर या काव्यसंग्रहातील कविता ह्या लोकगीतांशी, लावणीशी नाते सांगणाऱ्या आहेत. तर 'कंचनीचा

महाल' मधील कविता उत्कृष्ट शब्दरचना, यमकबध्दता, दीर्घता यामुळे प्रभावी ठरलेल्या दिसतात. उत्कृष्ट प्रसंग-रेखाटन, गतिमानता या काव्यसंग्रहातील कवितेत आलेले आहे. कवी दीर्घकाव्यात देखील आपली शैली टिकवून ठेवताना दिसतात.

कवी ना. घ. देशपांडे यांची लेखन शैली नाजूक, हळूवारपणा जपणारी आहे. मनाचा ठाव घेणारी त्यांची कविता उद्रेक व्यक्त करताना दिसत नाही. लयबध्दता आणि आशयघनता या कौशल्यामुळे या कवीच्या शब्दकलेवर रसिक वाचक मोहित झाल्यावाचून राहत नाही हे निश्चित.

## ०८. समारोप :

अशाप्रकारे कवी ना. घ. देशपांडे यांच्या 'शीळ' व 'कंचनीचा महाल' या दोन्ही काव्यसंग्रहात वरील वैशिष्टये आल्याचे दिसते. कवीच्या कवितेत भाव आणि अर्थ यांत जवळचे नाते दिसून येते. काव्यात वैदर्भीय बोलीतील विविध शद्वाचा वापर केल्याने प्रादेशिक वेगळेपण निर्माण होते. कवितेतील निसर्ग हा त्या विशिष्ट परिसरांतील आल्याचे दिसते.काव्यात यमक, लय, ताल अचूक येऊन त्यांची कविता गीत झाले आहे. प्रसंगवर्णनातील चित्रमयतेमुळे प्रसंग डोळ्यासमोर घडताना दिसतो. कवीची शैली हळूवारपण जपणारी अशी आहे. एकूणच ना. घ. देशपांडे यांच्या काव्याची वरील वैशिष्ट्ये प्रामुख्याने दिसून येतात.

# संदर्भ ग्रंथ सूची


| | | |
|---|---|---|
| १. | तेंडूलकर रमेश | लेख - कविता,<br>'साहित्य अध्यापन आणि प्रकार'<br>संपा. श्री. पु. भागवत, सुधीर रसाळ व इतर<br>मौज प्रकाशन, मुंबई ४०००३४<br>पृ.क्र. १८० |
| २. | शेळके शांता | लेख - 'सांजेचा फुलबहार'<br>'फुले आणि काटे' आत्मकथन<br>लेखक - ना. घ. देशपांडे<br>मेहता पब्लिशिंग, पुणे<br>पृ. क्र. २१ |
| ३. | करोगल सुषमा | लेख - 'ना. घ. देशपांडे'<br>'वैदर्भी प्रतिभा',<br>संपा. डॉ. स्नेहल तावरे<br>स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००७<br>पृ.क्र. २०६ |
| ४. | तत्रैव | पृ.क्र. १९३ |
| ५. | देशपांडे ना. घ. | मुलाखत - 'आवडीचे फुल'<br>'ललित' मासिक, मुंबई, एप्रिल १९८४<br>मुलाखत घेणारे - डॉ. शि. गो. देशपांडे<br>पृ.क्र. २६ व २७ |

| | | |
|---|---|---|
| ६. | कवी ग्रेस | व्याख्यान<br>मुलाखत 'आवडीचे फुल'<br>'ललित' मासिक, एप्रिल १९८४<br>मुलाखतकार - ना. घ. देशपांडे<br>मुलाखत घेणारे - प्रा. शि. गो. देशपांडे<br>पृ.क्र. ३४ |
| ७. | देशपांडे ना. घ. | प्रस्तावना,<br>'खूणगाठी' काव्यसंग्रह<br>लेखक- ना. घ. देशपांडे<br>मौज प्रकाशन गृह, मुंबई ४००००४ प्र.आ.१९७९<br>पृ.क्र. २१ |
| ८. | राजाध्यक्ष मं. वि. | प्रस्तावना<br>'शीळ' काव्यसंग्रह<br>ना. घ. देशपांडे<br>मौज प्रकाशन गृह मुंबई ४०००४<br>प्र. आ. १९५४<br>पृ. क्र. २ |
| ९. | मंगेशकर लता | प्रस्तावन<br>'रंग माझा वेगळा' काव्यसंग्रह, सुरेश भट<br>मौज प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९७४<br>पृ.क्र. १२ |

| | | |
|---|---|---|
| १०. | मोकाजी सयाजीराव | प्रस्तावना<br>आधुनिक मराठी गेय कविता<br>शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर<br>प्र. आ. २००२, पृ.क्र. १७ |
| ११. | देशपांडे ना. घ. | मुलाखत - 'आवडीचे फुल'<br>'ललित मासिक', मुंबई, एप्रिल १९८४<br>मुलाखत घेणारे - प्रा. शि. गो. देशपांडे<br>पृ. क्र. ३० |
| १२. | राजाध्यक्ष मं. वि. | 'प्रस्तावना'<br>'शीळ' काव्यसंग्रह<br>मौज प्रकाशन, मुंबई ४००००४<br>प्र.आ. १९५४, पृ.क्र. २२ |
| १३. | तत्रैव | पृ.क्र. २२ |